# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः03.04.2026** **वारः शुक्रवार**

---

•जनविश्वास विधेयक मंजूर झाल्यामुळे देशात जीवनमान आणि उद्योगांची प्रक्रिया करणं सुलभ होईल असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन. संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज सोळा एप्रिलपर्यंत संस्थगित.
•पेट्रोकेमिकल उत्पादनांवरचं सीमाशुल्क ३० जूनपर्यंत रद्द करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय.
•विधानसभा निवडणुकीसाठी प्रचार सुरू. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पुदुच्चेरीत, तर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या आसाममध्ये सभा.
•पश्चिम आशियातील संघर्ष शांततामय मार्गानं सोडवण्याचं संयुक्त राष्ट्रसंघाचे महासचिव अँटोनियो गुटेरेस यांचं आवाहन.
आणि
•खेलो इंडिया आदिवासी क्रीडा स्पर्धेची आज छत्तीसगडमधील रायपूरमध्ये सांगता.

**<u>जनविश्वास विधेयक</u>**
जनविश्वास विधेयक मंजूर झाल्यामुळे देशात जीवनमान आणि उद्योगांची प्रक्रिया करणं सुलभ होईल असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. या विधेयकामुळे कालबाह्य नियम आणि अटी रद्द करण्यात आल्या असून, विश्वासावर आधारित नियमावलीला बळ मिळेल असं पंतप्रधानांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे. या विधेयकामुळे खटले जलदपणे निकाली काढण्यास मदत होईल आणि याचिकांबाबतचा ताण कमी होईल, असंही त्यांनी म्हटलं आहे. या विधेयकासाठी चर्चा घडवण्याचा दृष्टिकोन उल्लेखनीय असल्याचं त्यांनी म्हटलं असून, विधेयक मंजुरीसाठी ज्यांनी योगदान दिलं त्यांचं अभिनंदन केलं आहे
हे विधेयक काल राज्यसभेत मंजूर करण्यात आलं. लोकसभेत ते बुधवारी मंजूर करण्यात आलं.

काही कायद्यांमध्ये दुरुस्ती करून काही गुन्हे 'अपराध' या श्रेणीतून वगळण्याची आणि त्यांना अधिक तर्कसंगत करण्याची तरतूद या विधेयकात आहे. या गुन्ह्यांसाठी त्यांच्या प्रमाणात दंड किंवा आर्थिक भुर्दंडाची तरतूद करण्यात आली आहे. एकंदर ७८४ तरतुदींबाबत सुधारणांचा प्रस्ताव असून, त्यापैकी ७१७ तरतुदींना गुन्ह्यांच्या चौकटीतून बाहेर काढण्यात आलं आहे.

केंद्रीय सशस्त्र पोलीस बल सामान्य प्रशासन विधेयकालाही काल संसदेनं मंजुरी दिली. या विधेयकाला काल लोकसभेची मंजुरी मिळाली; राज्यसभेत ते याआधीच मंजुर झालं होतं. केंद्रीय सशस्त्र पोलीस दलातले गट अ सर्वसाधारण कर्तव्य अधिकारी आणि इतर अधिकाऱ्यांची भरती आणि सेवेच्या अटींशी संबंधित सर्वसाधारण नियमांचं नियमन करणं, हे या विधेयकाचं उद्दिष्ट आहे.

हे विधेयक मंजूर झाल्यानंतर लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी सभागृहाचं कामकाज या महिन्याच्या १६ तारखेपर्यंत संस्थगित केलं. काही महत्त्वाच्या विधेयकांवर चर्चा करण्यासाठी हे सत्र बोलावण्यात येत असल्याचं बिर्ला यांनी सांगितलं. राज्यसभेचंही कामकाज १६ तारखेपर्यंत संस्थगित करण्यात आलं.

**<u>पंतप्रधान सभा</u>**
चार राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशामध्ये विधानसभा निवडणुकीसाठी प्रचार ठिकठिकाणी सुरू आहे. पंतप्रधान आणि भारतीय जनता पार्टीचे वरिष्ठ नेते नरेंद्र मोदी आज निवडणूक प्रचारासाठी पुदुच्चेरीमध्ये जाणार आहेत. पंतप्रधान एका रोडशोमध्ये भाग घेणार असून, एका सभेला संबोधितही करणार आहेत. पंतप्रधान आज दुपारी सव्वाचारच्या सुमारास पुदुच्चेरी विमानतळावर पोचतील. अन्नासलाई ते कामराजर पुतळा या भागात ते रोडशोमध्ये सहभाग घेतील. पंतप्रधानांच्या दौऱ्यासाठी सुरक्षा व्यवस्था कडेकोट करण्यात आली आहे.

केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे वरिष्ठ नेते अमित शहा आसाममधील धुबरी जिल्ह्यातील रतिदहा इथं, गोलपारा जिल्हयातील दुधनोई आणि चायगाव भागात सभा घेणार आहेत.

**<u>सीमाशुल्क</u>**

महत्त्वाच्या पेट्रोकेमिकल उत्पादनांवरचं सीमाशुल्क ३० जूनपर्यंत संपूर्णपणे माफ करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळाचे सदस्य संजय मंगल यांनी काल नवी दिल्लीत आंतर मंत्रालयीन पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या सवलतीमुळे प्लास्टिक, वस्त्रोद्योग, औषधनिर्माण यांसारख्या अनेक क्षेत्रांना फायदा होईल असं ते म्हणाले.

**उद्योगांनाएलपीजी**

पश्चिम आशियातील युद्धामुळे एलपीजी गॅसच्या जागतिक तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील स्वदेशी उद्योगाबरोबर परदेशी गुंतवणुकीच्या उद्योगांना तसंच नागरिकांना गॅसचा पुरवठा सुरळीत व्हावा, यासाठी महाराष्ट्र शासन आवश्यक ते सर्व प्रयत्न करत आहे, असं राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी काल सांगितलं. या संकटात कोणत्याही उद्योगाला राज्य शासन अडचण येऊ देणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

तेल किंमती

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी इराणबाबत इशारा दिल्यानंतर काल आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये वाढ झाली. ब्रेंच क्रूडचे भाव आठ टक्क्यांनी वाढून प्रति बॅरल १०९ डॉलरवर पोचले. अमेरिकेत तयार होत असलेल्या कच्च्या तेलाचे भावही ११ टक्क्यांवरून वाढून १११ डॉलरवर पोचले.

**रशिया उपपंतप्रधान भेट**

रशियाचे उपपंतप्रधान डेनिस मांतुरोव्ह यांनी काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नवी दिल्लीत भेट घेतली. व्यापार, खतं आणि आर्थिक भागिदारीसह उभय देशांना मान्य असलेल्या क्षेत्रांबाबत सुरू असलेल्या प्रगतीची माहिती मांतुरोव्ह यांनी पंतप्रधानांना दिली. दोन्ही बाजूंकडून सुरू असलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांबाबत पंतप्रधानांनी समाधान व्यक्त केलं.

**संयुक्तराष्ट्रपश्चिमआशिया**

संयुक्त राष्ट्रसंघाचे  महासचिव अँटोनियो गुटेरेस यांनी पश्चिम आशियातील संघर्ष शांततामय मार्गानं सोडवण्याचं आवाहन केलं आहे. अमेरिका, इस्राईल आणि इराण या देशांना संघर्ष थांबवण्याचं आवाहन त्यांनी समाजमाध्यमांद्वारे केलं आहे.

न्यूयॉर्कमधील सुरक्षा परिषदेच्या बाहेर माध्यमांशी बोलताना गुटेरेस यांनी युद्धाच्या झळा जितक्या वाढत आहेत तितकं मानवी ससेहोलपटही वाढत असल्याचं त्यांनी म्हटलं. वाद-विवाद शांततामय मार्गाने सोडवले पाहिजेत आणि सर्व सदस्य देशांच्या सार्वभौमिकता आणि क्षेत्रीय अखंडतेचा सन्मान राखला गेला पाहिजे असं त्यांनी म्हटलं आहे.

**पश्चिम आशिया**

पश्चिम आशियातील स्थितीबाबत ब्रिटनच्या परराष्ट्रमंत्र्यांनी आयोजित केलेल्या बैठकीत परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी भारताचं प्रतिनिधीत्व केलं. साठपेक्षा अधिक देशांनी या बैठकीत भाग घेतला. आंतरराष्ट्रीय जलमार्गांतून विनाअडथळा प्रवास करण्याची गरज मिसरी यांनी अधोरेखित केली.

**डोनाल्डट्रम्प**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ॲटर्नी जनरल पॅम बॉन्डी यांना पदावरून काढून टाकलं आहे. 'ट्रुथ सोशल' च्या माध्यमातून काल त्यांनी ही घोषणा केली. बॉन्डी यांच्या जागेवर डेप्युटी ॲटर्नी जनरल टॉड ब्लाँच यांना नियुक्त करण्यात येणार आहे. बॉन्डी यांनी जेफ्री एप्स्टाइन फाइल्स संदर्भात केलेल्या कामामुळे नाराज होऊन ट्रम्प यांनी हा निर्णय घेतला. अमेरिकेत ॲटर्नी जनरल न्याय विभागाचे प्रमुख म्हणून काम बघतात. याआधी, ५ मार्च रोजी ट्रम्प यांनी अमेरिकेच्या गृह सुरक्षा सचिव क्रिस्टी नोएम यांना पदावरून दूर केलं आहे.

**गुडफ्रायडे**

येशू ख्रिस्तांच्या बलिदानाचं स्मरण करणाऱ्या गुड फ्राय डे निमित्त आज देशभरातील विविध चर्चमध्ये विशेष प्रार्थना सभांचं आयोजन करण्यात आलं आहे. केरळमधील तिरुअनंतपुरमधल्ये सेंट जोसेफ मेट्रोपोलिटन कॅथेड्रल आणि सेंट मेरीज कॅथेड्रलसह विविध ठिकाणी प्रार्थना सभांसाठी भाविक मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

**आयओएससागरपूलमाधुरी**

संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ यांनी काल आय.ओ.एस.सागर या जहाजाला मुंबईतून झेंडा दाखवून रवाना केलं. हा उपक्रम हा भारताच्या भागीदारीच्या माध्यमातून नेतृत्व, एकतेद्वारे बल आणि शांतीद्वारे प्रगती यासंबंधी भारताच्या सामूहिक दृष्टिकोनाचं  प्रतिबिंब असल्याचं सेठ यांनी यावेळी बोलताना सांगितलं. भारताचा,शेजारी प्रथम हा दृष्टिकोन आणि व्हीजन महासागर या मुद्यांवर त्यांनी जोर दिला.

आय.ओ.एस.सागरच्या माध्यमातून सामायिक उद्दिष्टे आणि सामूहिक बांधिलकीसाठी समान विचार असलेले १६ समुद्री देश एकत्र येणं दुर्मिळ आणि महत्वाचं आहे असं नौदल प्रमुख अडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी यावेळी सांगितलं.

**आयपीएल**

इंडियन प्रीमिअर लीग म्हणजे आयपीएलमध्ये काल सनरायझर्स हैदराबादनं कोलकता नाइट रायडर्सला ६५ धावांनी पराभूत केलं. कोलकात्यामधील इडन गार्डन्स मैदानावर झालेल्या सामन्यात सनरायझर्सनं २२७ धावांचं आव्हान ठेवलं होतं. मात्र, कोलकता नाइट रायडर्सचा संघ सोळा षटकांमध्ये सर्वबाद १६१ धावा करू शकला. आज चेन्नई सुपर किंग्ज आणि पंजाब किंग्ज यांच्यात चेन्नईतील चिदंबरम स्टेडियमवर सामना होमार आहे.

**छत्तीसगड सांगता**

छत्तीसगडमध्ये सुरू असलेल्या खेलो इंडिया आदिवासी क्रीडा स्पर्धेची आज सांगता होणार आहे. रायपूर इथं समारोप समारंभ होणार असून, छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णूदेव सई प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. आंतरराष्ट्रीय मुष्टियोद्धा मेरी कोम आणि फुटबॉलपटू भाइचुंग भुतियाही या प्रसंगी उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेत कर्नाटकला सर्वाधिक म्हणजे २३ सुवर्णपदकं मिळाली आहेत. त्याच्या खालोखाल ओडिशाला वीस तर झारखंडला बारा सुवर्णपदकं मिळाली आहेत. धनुर्विद्या, मल्लखांब आणि कुस्तीसह सात प्रकारांमध्ये स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

**पाऊस**

महाराष्ट्रात पुण्यासह कोल्हापूर, सांगली, सातारा, अहिल्यानगर, आणि गडचिरोली जिल्ह्यात काल सोसाट्याचा वारा आणि मेघगर्जनेसह जोरदार पाऊस पडला.
पुणे आणि पिंपरी चिंचवड शहराला तर काल दुपारी पावसाने अक्षरश: झोडपून काढलं. सिंहगड रस्ता भागात झाड पडून एका महिलेचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे. नाशिक शहरासह जिल्ह्यात काल मुसळधार पावसाबरोबरच गारपीट देखील झाली. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं , नमस्कार.**